ePaper

## जरांगेंची प्रकृती बिघडली, छ. संभाजीनगरच्या रुग्णालयात दाखल



|| वर्ष - 7 | अंक - 335 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 25 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

आतील पानांत
- दिल्लीचा ४ धावांनी निसटता विजय
- मतभेद सर्वत्र होतात : राणी
- धर्माच्या आधारावर आरक्षणाचा प्रयत्न!
- जाहिरातींवरील कारवाई का रोखली?

## पुणे, मावळ, शिरूर , बारामती लोकसभा मतदारसंघांसाठी

# नरेंद्र मोदींची पुण्यात जाहीर सभा!

### नेहरू, गांधींनंतरचे रेसकोर्सवर सभा घेणारे तिसरे पंतप्रधान

**। पुणे । महाईन्यूज**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर प्रचार सभा रेसकोर्स मैदानावर येत्या सोमवारी (29 एप्रिल) सायंकाळी होणार आहे. पोलिसांकडून या सभास्थळी सुरक्षिततेचा आढावा घेण्यात आला आहे. यापूर्वी दिवंगत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी (१९७२) यांच्या सभा झाली होती. त्यानंतर तिसऱ्या पंतप्रधानांची सभा साडेचार दशकानंतर येथे होत आहे.**



पंतप्रधान मोदी यांची सभा स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर अपेक्षित होती. पुणे, मावळ, शिरूर आणि बारामती या चारही लोकसभा मतदारसंघांसाठी ही सभा होणार असल्याने सभेला मोठ्या प्रमाणात गर्दी अपेक्षित आहे. या चारही मतदारसंघातील कार्यकर्त्यांना सभा स्थानी पोहोचता यावे, यासाठी सर्वांना सोयीस्कर ठिकाण असावे, यासाठी रेसकोर्स मैदानाचा पर्याय निश्चित करण्यात आला आहे. सभेचे स्थान निश्चित झाल्यानंतर पोलिसांकडून तसेच 'एसपीजी'कडून सुरक्षिततेचा आढावा घेण्यात आला आहे. मोदी हे सायंकाळी सहा ते साडेसहापर्यंत सभास्थानी पोहोचतील, असे अपेक्षित आहे. लोहगाव विमानतळावरून मोदी सभास्थानी येणार आहे. सभा संपल्यानंतर ते सोमवारी पुण्यात मुक्कामी राहणार आहेत. राजभवन येथे त्यांचा मुक्काम असणार आहे. त्यानंतर मंगळवारी ते पश्चिम महाराष्ट्रात तीन सभा घेणार आहेत.

**रेसकोर्स मैदान आणि सभा**

रेसकोर्स मैदानावर दिवंगत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू तसेच इंदिरा गांधी यांच्या सभा झाल्या होत्या. त्यानंतर पंतप्रधान म्हणून मोदी यांची सभा येत्या सोमवारी होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून काही वर्षांपूर्वी या मैदानावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला होता.

#### इंदिरा गांधींची सभा

पंडित जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांची सभा रेसकोर्स मैदानवर झाली आहे. गांधी यांची १९७२ साली झालेल्या सभेच्यावेळी आपण व्यासपीठावर उपस्थित होतो. बांगलादेशाची स्थापना झाल्यानंतर देशभर दौरा केला होता. त्यावेळी ही सभा झाली होती. या सभेसाठी ग. दि. माडगूळकरांनी 'आज सैनिकापुढे प्रगटली विजयी रणदेवता' हे गीत रचले होते. हे गीत सुरू असताना इंदिरा गांधी त्याचा अर्थ दिवंगत माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना विचारला होता. त्यावेळी चव्हाणांनी आपल्याला बोलावून घेत इंदिरा गांधी यांना त्या गीताचा अर्थ सांगण्यास सांगितल्याची आठवण माजी आमदार उल्हास पवार यांनी सांगितली.

---

# रहाटणी -पिंपळे सौदागरमध्ये विजेचा लपंडाव

### माजी विरोधी पक्षनेते नाना काटे आक्रमक: वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी

**। पिंपरी। महाईन्यूज ।**

**रहाटणी -पिंपळे सौदागर परिसरात विजेचा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते नाना काटे आक्रमक झाले आहेत. वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी त्यांनी केले आहे.**



रहाटणी-पिंपळे सौदागर हा परिसर गावठाण व सोसायटी बहुल भाग आहे. या परिसरात घरुन काम करणा-यांची संख्या जास्त असून सध्या विद्यार्थ्यांच्या परिक्षा देखील सुरु आहेत. तसेच सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. रहाटणी-पिंपळे सौदागर परिसरातील रात्री-अपरात्री नेहमीच लाईट जाण्याचा प्रमाण वाढले आहे. उकाड्यामुळे नागरिकांचे बेहाल होत आहेत.

योग्य क्षमतेने विजपुरवठा होत नसल्यामुळे व्होल्टेज कमी-जास्त झाल्यामुळे विजेवर आधारित उपकरणे ना दुरुस्त होतात. यामुळे लहानापासून थोरांपर्यंत प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे. लोकप्रतिनीधी या नात्यांने आम्हाला त्यांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे. तसेस भागातील एखाद्या ठिकाणी खोद काम करताना केबल डॅमेज झाल्यास लवकरात-लवकर दखल संबंधित अधिकारी व कामगाराकडून घेतली जात नाही. ही खूप गंभीर बाब असून याची दखल घेण्यात यावी.

#### व्यवस्थित व सुरळीत वीज पुरवठा मिळावा

रहाटणी-पिंपळे सौदागर परिसरात महावितरणच्या तक्रारीचे लवकरात लवकर निराकरण करावे व विद्युत पुरवठ्याच्या सुरु असलेला लपंडाव त्वरित थांबवावा. व जसे नागरिक नियमित विजभरणा करतात. तसे त्यांना व्यवस्थित व सुरळीत वीज पुरवठा देण्यात यावा.

# संपत्ती लुबाडण्याचा काँग्रेसचा कट!

## जनता यशस्वी होऊ देणार नाही; केशव उपाध्ये यांचा रोखठोक इशारा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशाची सामाजिक घडी पूर्णपणे मोडून केवळ अल्पसंख्यांक मुस्लिमांच्या लांगूलचालनाचे राजकारण करण्याचे घातक राजकारण उघडे पडल्यामुळे आता काँग्रेस हादरून गेली असून, संपत्तीचे फेरवाटप करण्याचा माओवादी कट काँग्रेसने रचल्यामुळे सावध राहणे गरजेचे आहे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी आज पत्रकार परिषदेत केले. देशातील साधनसंपत्तीवर पहिला अधिकार अल्पसंख्यांकांचा, म्हणजे मुस्लिमांचा आहे, असा दावा २००६ मध्येच तेव्हाचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी केला होता. आता काँग्रेस सत्तेवर आल्यास तो प्रत्यक्षात आणला जाईल आणि गरीबांकडील संपत्ती हिरावून घेतली जाईल, असा इशाराही उपाध्ये यांनी दिला.**

राजस्थानमधील बसवारा येथील जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी काँग्रेसचा हा कट उघड केल्यामुळे काँग्रेस आता भयभीत झाली असून त्यांनी थटथयाट सुरू केला आहे. मात्र, काँग्रेसच्या तुष्टीकरणाच्या राजकारणामुळेच देशातील दलित, मागासवर्गीय, ओबीसी समाज विकासापासून वंचित राहिला असून केवळ अल्पसंख्याकांची मते मिळविण्यासाठी काँग्रेसने या समाजाची कायम उपेक्षा केली आहे, असा आरोपही उपाध्ये यांनी केला.

याउलट, देशाच्या विकासाची फळे समाजाच्या प्रत्येक स्तरावरील अखेरच्या व्यक्तिपर्यंत पोहोचली पाहिजेत, सरकारच्या प्रत्येक योजनेचा संपूर्ण लाभ खऱ्या लाभार्थीला मिळाला पाहिजे आणि प्रत्येक कुटुंबाला सक्षमतेच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत, यावर मोदी सरकारने नेहमीच भर दिला आहे. अंत्योदयाच्या संकल्पनेवर भारतीय जनता पार्टीची श्रद्धा असून अंत्योदयाच्या नीतीवरच पक्षाची वाटचाल सुरू असल्याने मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत आखलेल्या प्रत्येक योजनेचे लाभ समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले आहेत, असा दावाही उपाध्ये यांनी केला. गरीबांच्याही संपत्तीवर डोळा असलेली व संपत्ती काढून घेऊन अन्य समाजात तिचे वाटप करण्याचा कट आखणारी काँग्रेस व प्रत्येक समाजघटकास संपत्ती




निर्माण करण्याच्या संधी देणारी भाजप असा हा सामना आहे, असेही ते म्हणाले. मुस्लिमांचे लांगूलचालन करून निवडणुका जिंकण्याचे काँग्रेसचे राजकारण १९६० च्या दशकापासून सुरू आहे, आणि भाजप सातत्याने याविरुद्ध संघर्ष करत आहे. एका बाजूला तुष्टीकरणाचे राजकारण आणि दुसरीकडे मोदी सरकारचे विकासाचे राजकारण यांतील या संघर्षात देशातील जनतेने कायमच विकासाच्या राजकारणास साथ दिल्यामुळेच प्रत्येक निवडणुकीत काँग्रेसची सातत्याने हार होत असल्याने आता जनतेच्या संपत्तीवर काँग्रेसचा डोळा आहे, असा आरोपही त्यांनी केला. लोकांकडील अतिरिक्त संपत्ती काढून घेण्याची ही मूळ विचारसरणी माओवादी-नक्षलवाद्यांची असून काँग्रेस आता ती प्रत्यक्षात आणू पाहात आहे, असे ते म्हणाले. काँग्रेसच्या २०२४ च्या निवडणूक जाहीरनाम्यात असे स्पष्टपणे नमूद आहे की, देशातील जाती, उपजातींच्या सामाजिक, आर्थिक स्थितीची गणना करण्यासाठी देशव्यापी कार्यक्रम राबविला जाणार असून, त्यातून मिळणाऱ्या माहितीच्या आधारावर पुढील कार्यवाहीचा दिशा मजबूत केली जाईल, असे काँग्रेसच्या २०२४ च्या निवडणूक जाहीरनाम्यात स्पष्टपणे नमूद केले गेले आहे.

या देशात बहुसंख्यवादाला थारा नाही, असेही काँग्रेसने म्हटले असून अल्पसंख्यांना आर्थिक मदत, शैक्षणिक लाभ, सार्वजनिक रोजगार, कौशल्य विकास, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रांत अधिक संधी देण्याची हमी काँग्रेसने दिली आहे. मागासवर्गीय जातीजमातींसाठी असलेल्या आरक्षणाच्या ५० टक्के मर्यादा हटवून ती वाढविली जाईल. अल्पसंख्यांकांना अधिकाधिक लाभ मिळविण्याचीच ही योजना असून संपत्ती व उत्पन्नातील असमानता दूर करण्याच्या काँग्रेसच्या आश्वासनामुळेदेखील अतिरिक्त संपत्तीधारकांची संपत्ती अल्पसंख्याकांकडे वळविण्याचा छुपा हेतू उघड झाला आहे, असे ते म्हणाले. देशाचा एक्स रे करून वित्तीय संस्थांचे सर्वेक्षण करण्याचा व देशातील संपत्तीचे स्रोत शोधण्याचा काँग्रेसचा इरादा राहुल गांधी यांनी ५ एप्रिल रोजी जाहीरनामा जारी करतानाच उघड केला होता, मात्र, त्याचे कथानक फार पूर्वीच लिहिले गेले आहे. कोणाकडे किती संपत्ती आहे हे शोधून काढण्याची मोहीम हाती घेण्याचे १६ मार्च २०२४ रोजी महाराष्ट्रात बोलतानाही राहुल गांधी यांनी जाहीर केले होते, तर ६ एप्रिल २०२४ रोजी तेलंगणात बोलताना, 'जिसकी जितनी आबादी, उतना उसका हक' असे जाहीर करून त्यांनी संपत्तीच्या वितरणाचा कट उघडही केला आहे, असा आरोप उपाध्ये यांनी केला. गरीब, मागासवर्गीयांची कमाई, महिलांची बचत काढून घेऊन त्यातील मोठा वाटा अल्पसंख्याकांच्या ताटात घालण्याचा काँग्रेसचा इरादा यातूनच स्पष्ट झाला आहे, असे ते म्हणाले.याआधी, १९६३ व १९७४ मध्ये जवाहरलाल नेहरू व इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखालील काँग्रेसने तर, 'कम्पल्सरी डिपॉझिट स्कीम कायदा' या गोंडस नावाखाली लोकांची संपत्ती जप्त करण्यासंबंधीचे कायदेच संमत केले होते, व त्यामुळे आपल्या कमाईचा १८ टक्के हिस्सा सरकारजमा करणे सरकारी कर्मचारी व संपत्तीधारकांना भाग पडत होते.

### जनता काँग्रेसचा हा कट उधळून लावेल

अल्पसंख्याकांचे तुष्टीकरण करण्यासाठी साधनसंपत्ती त्यांच्याकडे सुपूर्द करण्याची डॉ. मनमोहन सिंह यांची ही भूमिकाही अचानक जन्माला आली नव्हती. अनुसूचित जातींच्या यादीत मुस्लिमांचा समावेश करणे, सरकारी नोकऱ्यांत मुस्लिमांना १५ टक्के आरक्षण ठेवणे, धर्माच्या नावाखाली ओबीसी आरक्षणाचे विभाजन करून मुस्लिमांकरिता सहा टक्के रक्षण ठेवणे व धर्मांतरानंतरही अनुसूचित जातींचा दर्जा कायम ठेवणे असे अनेक प्रयत्न काँग्रेसकडून सुरू होते असा दावादेखील श्री. उपाध्ये यांनी केला. डॉ. मनमोहन सिंह यांच्या या वक्तव्याच्या काही दिवस अगोदर सच्चर समितीचा अहवाल आला आणि मुस्लिमांची स्थिती दलितांहूनही बिकट असल्याचा दावा त्यामध्ये केला गेला, हा काही निव्वळ योगायोग म्हणता येईल का, असा सवालही त्यांनी केला. काँग्रेसला देशातीलसामाजिक व्यवस्थेची वीण नष्ट करायची असून केवळ मते मिळवून सत्तेचे लोणी ओरपण्यासाठी अल्पसंख्याकांच्या तुष्टीकरणाचे राजकारण करायचे आहे.

---

# मनसे सैनिकांच्या पाठिंब्याने माझी ताकद वाढली : आढळराव पाटील

## शिरूर – हवेली मतदार संघातून मोठे मताधिक्क्य मिळवून देण्याचा निर्धार

। पुणे । महाईन्यूज ।

**शिरूर लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांना शिरूर – हवेली मतदार संघातून मोठे मताधिक्क्य मिळवून देण्याचा निर्धार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केला.**




मनसैनिकांच्या पाठिंब्यामुळे माझी ताकद वाढली असून, राज ठाकरे यांच्या पाठिंब्यामुळे तरूणांची ताकद प्राप्त होणार असल्याचे आढळराव पाटील यांनी नमूद केले.मनसे चे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिला असल्याच्या पार्श्वभूमीवर शिरूर व हवेली तालुक्यातील मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वाघोली येथे झालेल्या नियोजन बैठकीत आढळराव पाटील यांना मोठे मताधिक्क्य मिळवून देण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी मनसेचे नेते राजेंद्र उर्फ बाबू वागसकर, प्रदेश सरचिटणीस बाळा शेडगे, कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र तांबोळी, पुणे शहर उपाध्यक्ष हेमंत बत्ते, जिल्हाध्यक्ष रामदास दरेकर, उपाध्यक्ष महिबूब सय्यद, काका गायकवाड, किरण गव्हाणे, सविता दरेकर, ॲड. राहुल कदम, शिरूर तालुकाध्यक्ष तेजस यादव, अविनाश घोगरे, वींद्र गुळादे, हवेली तालुकाध्यक्ष चेतन चौधरी, शिरूर शहर अध्यक्ष ॲड. आदित्य मैड, सचिव रवीराज लेंडे, संतोष नरके, सुनिल दरेकर, धर्मा गावडे आदी प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. मनसेच्या पाठिंब्यामुळे महायुतीला बळ येणार असल्याचे आढळराव पाटील यांनी नमूद केले. तर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी संसदेत प्रयत्न केले जातील, असेही ते म्हणाले. राज ठाकरे हे तरूणांच्या गळ्यातील ताईत असून, त्यांच्या पाठिंब्याचा महायुतीला मोठा लाभ होणार असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व देवेंद्र फडणवीस यांनी पक्षाध्यक्ष राज ठाकरे साहेब यांच्याशी मराठी तरूणांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा केली असून, सरकारची याबाबतीतली ध्येयधोरणे पसंत पडल्याने आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारखे कणखर नेतृत्व देशाला लाभत असल्यानेच ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती मनसेचे बाबू वागसकर यांनी दिली.

### घर टू घर प्रचाराचे नियोजन

मनसेचे पुणे शहर उपाध्यक्ष हेमंत बत्ते यांनी उपस्थितांचे स्वागत केले. उपजिल्हाध्यक्ष महिबूब सय्यद यांनी आभार मानले. यावेळी पुणे जिल्हा बँकेचे संचालक प्रदीप कंद, माजी नगरसेवक शांताराम कटके, भाजप हवेली तालुकाध्यक्ष श्याम गावडे, शिरूर- हवेली तालुका सरचिटणीस विजय जाचक आदी यावेळी उपस्थित होते. प्रचारार्थ मनसेच्या वतीने संपर्क मोहिम हाती घेण्यात आली असून, शिरूर–हवेलीत घर टू घर प्रचाराचे नियोजन करण्यात आल्याचे रामदास दरेकर यांनी सांगितले.

# पुणे विमानतळावर प्रवाशांचे हाल संपेनात!

## इंडिगोच्या यंत्रणेतील बिघाडाने उड्डाणाला तीन तासांचा विलंब

**। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**इंडिगो कंपनीच्या यंत्रणेतील बिघाडाचा फटका पुणे विमानतळावरील प्रवाशांना मंगळवारी मध्यरात्री बसला. यंत्रणेतील बिघाडामुळे पुणे ते हैदराबाद विमानाचे रात्री तब्बल तीन तास उशिराने उड्डाण झाले. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली.**



मागील काही काळात पुणे विमानतळावरील उड्डाणांना विलंब होत असल्याचे चित्र आहे. विमानतळावरील प्रवासांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे सध्याचे टर्मिनल अपुरे पडत आहे. यातच विमानतळावर मंगळवारी इंडिगो कंपनीच्या यंत्रणेत बिघाड झाला. यंत्रणेतील बिघाडामुळे चेक इनची प्रक्रियेचा वेग मंदावला. यामुळे अनेक तास प्रवाशांना चेक इनसाठी रांगेत थांबावे लागले. अनेक प्रवाशांनी समाज माध्यमांवर आपला अनुभव मांडत विमान कंपनीच्या कारभारावर टीका केली.

पुणे ते हैदराबाद विमानाची वेळ रात्री १०.३० वाजता होती. चेक इन यंत्रणेतील बिघाडामुळे संतप्त प्रवाशांनी इंडिगोच्या कर्मचाऱ्यांनाही धारेवर धरले. त्यांच्याकडून समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर तब्बल तीन तास विलंबाने १ वाजून २० मिनिटांनी विमानाचे उड्डाण झाले.

### इंडिगोकडून दिलगिरी

» याबद्दल इंडिगोने म्हटले आहे की, पुणे विमानतळावरील आमच्या यंत्रणेत बिघाड झाल्याने प्रवाशांची गैरसोय झाल्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. चेक इनची प्रक्रिया संथ झाल्याने प्रवाशांना अधिका काळ रांगेत थांबावे लागले. यंत्रणेतील बिघाड दूर करण्याचे प्रयत्न आमच्या डिजिटल पथकाकडून सुरू आहेत. प्रवाशांनी दाखविलेल्या संयमाबद्दल आम्ही आभारी आहोत.

---

# ...अन रोहित पवारांनी घेतला पार्थचा आधार!

## रोहित आणि पार्थ पवार हिंजवडीतील बगाड यात्रेत एकत्र



**। पिंपरी ।**

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थच्या मावळमधील पराभवाचा बदल घेणार असल्याचे उपरोधिकपणे वक्तव्य करणारे आमदार रोहित पवार आणि पार्थ पवार मंगळवारी रात्री हिंजवडीतील बगाड यात्रेत एकत्र आले होते. बगाडावर चढताना पार्थने रोहित पवारांना हात दिला. गर्दी असल्यामुळे दोघेही एकमेकांना आधार देत होते. राजकारणात कितीही कटुता आली असली तरी तिसऱ्या पिढीने नातेसंबंध घट्ट असल्याचा संदेश दिल्याचे दिसून आले.**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यातील राजकीय संघर्ष वाढला आहे. बारामतीमधून शरद पवार यांच्या कन्या, खासदार सुप्रिया सुळे यांच्याविरोधात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार निवडणूक लढवत आहेत. सगळे पवार कुटुंब सुप्रिया सुळे यांच्या बाजूने प्रचारात उतरल्याचे दिसते. तर, अजित पवार यांच्याकडून कुटुंबियांनी एकटे पाडल्याचे सांगितले जाते. पवार कुटुंबात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. मावळचे महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी रोहित पवार मंगळवारी पिंपरी-चिंचवड शहरात आले होते. बरेच काही पचविण्यासाठी पुत्र पार्थचा पराभव पचवत ज्याने पराभव केला, त्याचाच आता उपमुख्यमंत्री अजित प्रचार करत आहेत. पण, मी पार्थच्या पराभवाचा बदला घेण्यासाठी मावळमध्ये आलो असल्याचा उपरोधिक टोला रोहित यांनी लगाविला होता.

### सोशल मीडियावर फोटो व्हायरल

» त्यानंतर रात्री बारामती लोकसभा मतदारसंघात येत असलेल्या हिंजवडीच्या बगाड यात्रेत पार्थ आणि रोहित पवार एकत्र दिसले. बगाडावर चढताना पार्थ यांनी रोहित यांना हात दिला. बगडावर गर्दी जास्त असल्यामुळे दोघांनी एकमेकांना आधार दिला. दोघांनी काहीवेळ हसत संवाद साधला. त्यामुळे राजकारणात कितीही कटुता आली असली तरी तिसऱ्या पिढीने नातेसंबंध घट्ट असल्याचा संदेश दिला. याबाबतची चित्रफीत आणि छायाचित्रे समाजमाध्यमावर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाले आहे.

---

# महायुतीचे श्रीरंग बारणे की महाविकास आघाडीच्या संजोग वाघेरेंच्या रॅलीत गर्दी?



**। पिंपरी ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे विरुद्ध शिवसेना उद्धव ठाकरे गट अशी थेट लढत आहे. आजपर्यंतचा इतिहास पाहता मावळ लोकसभेत शिवसेनेचा खासदार दिल्लीत गेलेला आहे. यावेळी दोन्ही शिवसेनेमध्ये सामना आहे. शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार श्रीरंग बारणे आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार संजोग वाघेरे यांनी मोठं शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज नुकताच भरला. पण, चर्चा आहे ती उमेदवारी अर्ज भरताना झालेल्या गर्दीची. बारणे यांचा उमेदवार अर्ज भरताना अल्प गर्दी होती, तर संजोग वाघेरे यांचा उमेदवारी अर्ज भरताना बारणेपेक्षा अधिक गर्दी असल्याची चर्चा मावळ लोकसभा मतदारसंघात आहे.**

मावळ लोकसभा मतदारसंघात श्रीरंग बारणे यांची आत्तापर्यंत चलती आहे. दोन वेळा मोदी लाटेत निवडून आलेल्या श्रीरंग बाराणेंना ही लोकसभा काहीशी जड जाण्याची शक्यता असल्याचं बोललं जातं आहे. २२ एप्रिल रोजी महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, चंद्रकांत पाटील, प्रवीण दरेकर यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या उपस्थित उमेदवारी अर्ज भरला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे येणार असल्याने रॅलीला मोठी गर्दी असेल, असे प्रत्येकाला वाटत होतं. प्रत्यक्षात गर्दी कमी आणि ढोल ताशा पथकाची रांग होती.

यावरूनच आता बारणेंच्या रॅलीबद्दल शहरात जोरदार चर्चा झाली. दुसऱ्या दिवशी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार संजोग वाघेरे यांनी मोठं शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज भरला. श्रीरंग बारणे आणि आमची रॅली बघून लोकसभेचे चित्र स्पष्ट होईल असा विश्वास वाघेरे यांनी आधीच व्यक्त केला होता. तशी ताकदही बघायला मिळाली.

### श्रीरंग बारणे यांनी केला होता पार्थ पवारांचा पराभव

» २०१९ ला झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत अजित पवारांचे सुपुत्र पार्थ पवार यांचा श्रीरंग बारणे यांनी दोन लाख १५ हजार ९१३ मताधिक्याने पराभव केला होता. अजित पवार यांच्यासह सुनेत्रा पवार यांनीही कोपरा सभा घेऊन पार्थ पवार यांचा प्रचार केला होता. अख्ख पवार कुटुंब पार्थसाठी मैदानात उतरलं होतं. तरीही पवार कुटुंबातील सदस्याचा पराभव झाला. यामुळे श्रीरंग बारणे यांचा उत्साह द्विगुणित झाला होता. आजही श्रीरंग बारणे हे पार्थच्या पराभवाचा उल्लेख करताना दिसतात.



भूमिका

# आचारसंहिता : रोखठोक तरीही मानवी!

**केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीची घोषणा केली त्या दिवसापासून देशभर निवडणुकांसाठीची आदर्श आचारसंहिता लागू झाली. आदर्श आचारसंहितेचे अंतिम ध्येय मतदारांनी निर्भयपणे आणि कोणत्याही दबावास बळी न पडता मतदानाचा अधिकार बजावावा हेच आहे. नवी लोकसभा अस्तित्वात आल्यावर आदर्श आचारसंहितेचा कालावधी समाप्त होईल.**




आचारसंहितेच्या तरतुदींची पूर्तता केंद्र सरकार, राज्य सरकार याचबरोबर सर्व महामंडळे आणि शासकीय अर्थसाहाय्यित संस्थांना करावी लागते. आदर्श आचारसंहितेमधील सर्वसामान्य तरतुदी सर्वांनाच लागू होतात आणि त्यामध्ये निवडणुकीला उभ्या राहणाऱ्या इच्छुक उमेदवारांचाही समावेश होतो.आदर्श आचारसंहितेनुसार संबंधित यंत्रणेची योग्य पद्धतीने आगाऊ परवानगी घेऊन निवडणूक प्रचाराचे सर्व कार्यक्रम करणे राजकीय पक्षांवर आणि उमेदवारांवर बंधनकारक आहे. प्रचार मिरवणुकीमुळे वाहतुकीला अडथळा होणे अपेक्षित नाही. प्रचाराची किंवा मिरवणुकीची परवानगी म्हणजे सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अडथळा आणण्याची परवानगी नव्हे! सर्व राजकीय पक्षांना निवडणूकविषयक सभांसाठी मैदाने आणि आवश्यकता असल्यास हेलिपॅडची सुविधा सारख्या प्रमाणात उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. त्यामध्ये कोणत्याही पक्षाला अथवा उमेदवारासाठी झुकते माप देणे अपेक्षित नाही. आचारसंहितेच्या कालावधीत सरकारी खर्चाने शासकीय योजनांची जाहिरात करता येत नाही. सत्तारूढ पक्षाच्या मंत्र्यांना निवडणूक प्रचाराचे काम आणि शासकीय कामकाज यांची सरमिसळ करता येत नाही. सरकारी कामकाजासाठी जनतेचा पैसा वापरला जातो आणि म्हणून सरकारी खर्चातून स्वत:ची, स्वत:च्या पक्षाची प्रसिद्धी करणे उचित नाही. तो आचारसंहितेचा भंग ठरतो.आचारसंहितेच्या काळात सरकारतर्फे राबविण्याच्या नव्या प्रकल्पांची अथवा कार्यक्रमांची घोषणा करता येत नाही. कुठल्याही प्रकारचे आर्थिक अनुदान किंवा त्यासंबंधीचे आश्वासन देता येत नाही. पायाभरणी समारंभांसारखे कार्यक्रम आचारसंहितेच्या काळात करता येत नाहीत. सत्तारूढ पक्षाच्या बाजूने मतदारांवर प्रभाव पडू शकेल अशा गोष्टी प्रतिबंधित आहेत. यंत्रणेमार्फत आणि राजकीय सहभाग न घेता अत्यावश्यक कामे मात्र हाती घेता येतील. या तरतुदींमागील उद्दिष्ट लक्षात घेतले पाहिजे. निवडणूक काळात सरकारी यंत्रणा एखाद्या पक्षाच्या दावणीला बांधणे आचारसंहितेला अभिप्रेत नाही. तरी, पूर्णतेच्या टप्प्यावर असलेल्या सार्वजनिक हिताच्या बाबी वापरात आणण्यासाठी आचारसंहितेमुळे विलंब होऊ नये अशी निवडणूक आयोगाची भूमिका आहे. आचारसंहितेच्या कालावधीत शासनाच्या नव्या योजनांना मान्यता देणे आणि राजकीय पदाधिकाऱ्यांनी लाभार्थीकेंद्री योजनांचा आढावा घेणे आचारसंहितेचे उल्लंघन ठरते. अशा योजना पूर्वीपासून चालू असल्या तरी हे बंधन लागू आहे. कल्याणकारी योजनांसाठी निधी आणि शासकीय कामांची कंत्राटे देता येणार नाही. त्यासाठी आयोगाची परवानगी घ्यावी लागेल. खासदार आणि आमदार इत्यादींचे त्यांच्या निधीमधून घेण्यात आलेल्या वाहनांवरील नाव झाकणे अपेक्षित आहे. अन्यथा तो संबंधित लोकप्रतिनिधीचा निवडणूक प्रचार मानला जातो. असा खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये गणला जातो. यंदा लोकसभेच्या मतदारसंघासाठी उमेदवाराच्या निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा ९५ लाख रुपये आहे. आचारसंहितेबद्दलचे निर्देश केवळ निवडणूक आयोग देऊ शकतो. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आयोगाचे प्रतिनिधित्व करत असते. राज्यभरात आयोगाच्या वतीने निवडणूक संचालित करण्याचे काम पाहात असते. आचारसंहितेच्या कालावधीत राज्य सरकारकडून आयोगाकडे पाठविण्याचे सर्व संदर्भ राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून जावे लागतात. काही प्रकारची कामे संबंधित शासकीय यंत्रणा आयोगापर्यंत न जाताही सुरू ठेवू शकतात. उदा. सर्व प्रकारच्या मान्यता आणि परवानग्या प्राप्त झालेली आणि प्रत्यक्ष सुरू असलेली कामे किंवा लाभार्थीची नावे आचारसंहितेच्या आधीच जाहीर झालेले प्रकल्प, जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावरील निविदांचे मूल्यमापन आणि अंतिम करण्याचे काम इत्यादी.

## संपादकीय »

# घंटागाडी बरी...

***सद्या:स्थितीत आपल्यासमोरची आव्हाने काय आहेत, याचे भान राज्यातील राजकारण्यांस असल्याच्या खुणा शोधूनही सापडणार नाहीत.***

दशकभराच्या संसारानंतर घटस्फोटित पती-पत्नींचे एकमेकांविषयी अद्वातद्वा बोलणे आणि महाराष्ट्रातील राजकीय भाषणबाजी यांत तूर्त काहीही फरक नाही. प्रेमात पडण्याच्या तरल काळात एकमेकांसाठी सूर्यचंद्र तोडून आणण्याची भाषा करणारे घटस्फोटानंतर एकमेकांची किरकोळ उणीदुणीही काढू लागतात त्याप्रमाणे महाराष्ट्रातील राजकीय पक्षांचे झाले आहे. आपण कोणत्या काळात आहोत, आपल्यासमोरची आव्हाने काय, आपणास स्पर्धा कोणत्या प्रांतांशी करावयाची आहे, त्यासाठी काय करावे लागेल, आपले प्रतिस्पर्धी किती तगडे आहेत... अशा कोणत्याही म्हणून मुद्द्यांचे भान राज्यातील राजकारण्यांस असल्याच्या खुणा शोधूनही सापडणार नाहीत. हे सर्व रमले आहेत त्यांच्या त्यांच्या भूतकाळात! कोणी कोणाच्या पाठीत खंजीर खुपसला आणि कोणी कोणास दगा दिला.

भारताचा विख्यात बुद्धिबळपटू, माजी जगज्जेता विश्वनाथन आनंद वयाच्या १७ व्या वर्षीपर्यंत 'ग्रँडमास्टर' बनला नव्हता. १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आनंद ज्युनियर जगज्जेता बनला. गुकेश त्या वयाचा होईपर्यंत बहुधा बुद्धिबळातील सीनियर जगज्जेता बनलेला असेल.

# भारतीय बुद्धिबळप्रेमी फारसे पडणार नाहीत



आनंदने बुद्धिबळात जे मिळवले, ते अतुलनीय खरेच. पण त्याची गादी चालवणारा भारतात कोणी तयार होईल का, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या फंदात आता भारतीय बुद्धिबळप्रेमी फारसे पडणार नाहीत. कारण गुकेशच्या रूपात त्या प्रश्नाचे खणखणीत उत्तर मिळाले आहे. १२व्या वर्षीच गुकेश ग्रँडमास्टर बनला. या खेळाच्या इतिहासातील सर्वात युवा ग्रँडमास्टर बनण्याचा त्याचा विक्रम अवघ्या १७ दिवसांनी हुकला! भारताच्या ताज्या दमाच्या युवा ग्रँडमास्टरांच्या गटामध्ये गुकेश सर्वात तरुण. सुरुवातीच्या वर्षांमध्ये त्याच्यापेक्षा आर. प्रज्ञानंद, निहाल सरीन, अर्जुन एरिगेसीसारख्या उदयोन्मुख बुद्धिबळपटूंनी अधिक चमक दाखवली होती. तरीदेखील प्रसिद्धीचा किंवा प्रतिकूल तुलनेचा जराही परिणाम खेळावर होऊ द्यायचा नाही, ही समज गुकेशमध्ये खूप आधीपासून दिसून येते. ही परिपक्वता, त्या जोडीला मानसिक कणखरपणा आणि एकाग्रता या गुकेशच्या जमेच्या बाजू. आनंद आणि प्रज्ञानंद यांच्याप्रमाणेच गुकेशही चेन्नईकर. त्या शहरात एकामागोमाग एक गुणवान बुद्धिबळपटू कसे निर्माण होतात हा स्वतंत्र अभ्यासाचाच विषय ठरेल.कँडिडेट्स स्पर्धेमध्ये यंदा खुल्या आणि महिला गटात मिळून विक्रमी पाच भारतीय बुद्धिबळपटू उतरले होते. एके काळी असा संख्यात्मक दबदबा पूर्वाश्रमीच्या सोव्हिएत महासंघाकडून दिसायचा. महाराष्ट्राचा विदित गुजराथी, गुकेश आणि प्रज्ञानंद; तसेच महिला गटात कोनेरु हम्पी आणि आर. वैशाली यांनी कँडिडेट्स स्पर्धेपर्यंत मजल मारली होती. गुकेशसह प्रत्येकाने या स्पर्धेत काही ना काही छाप पाडलीच. भारतीय बुद्धिबळपटूंना या स्पर्धेत फार संधी मिळणार नाही, असे भाकीत बहुतेक माजी बुद्धिबळपटू आणि विश्लेषकांनी व्यक्त केले होते. त्याचा फारसा परिणाम खेळावर होऊ न देता, प्रत्येकाने आपला सर्वोत्तम खेळ करण्याचा प्रयत्न केला. काही थक्क करणारे विजय नोंदवले, तसेच काही वेळा खंतावणारे पराभवही पाहिले. हम्पी वगळता साऱ्यांसाठी हा नवीन अनुभव होता. गुकेशच्या बाबतीत परिस्थिती बऱ्यापैकी प्रतिकूल होती. स्पर्धा सुरू होण्याच्या वेळी तो सर्वात युवा बुद्धिबळपटू होताच, शिवाय क्रमवारीमध्येही सहावा होता. किमान तीन खेळाडूंना सर्वाधिक संधी आहे यावर बहुतांचे एकमत होते. अमेरिकेचे फॅबियानो करुआना आणि हिकारु नाकामुरा आणि रशियाचा इयान नेपोम्नियाशी हे तिघेही यापूर्वी कँडिडेट्स खेळलेले आहेत. नेपोम्नियाशीने तर दोन वेळा ही स्पर्धा जिंकलेली आहे. या तिघांचे आव्हान मोडून गुकेश सर्वात युवा कँडिडेट्स विजेता बनला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम


महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला 'महाईन्यूज'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# नवनीत राणांसमोर शेतकऱ्यांचा गोंधळ!

## नवनीत राणा मंदिरात दर्शनासाठी गेल्या असताना घडला प्रकार

। नगर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल रोजी अमरावती लोकसभा मतदारसंघात मतदान होत आहे. आज (२४ एप्रिल) प्रचाराचा शेवटचा दिवस आहे. तसेच दि. २३ एप्रिल रोजी श्री हनुमान जन्मोत्सव असल्यामुळे अनेक उमेदवारांनी आपापल्या मदारसंघातील जन्मोत्सव सोहळ्यांना हजेरी लावली.**



अमरावतीच्या खासदार नवनीत राणा आणि त्यांचे पती आमदार रवी राणा हे हनुमान चालीसाच्या आंदोलनातून करोना काळात चांगलेच चर्चेत आले होते. यानिमित्त नवनीत राणा यांनीही आपल्या मतदारसंघातील हनुमान मंदिरांना भेटी दिल्या. मात्र अंजनगाव तालुक्यातील चौसाळा गावात हनुमान मंदिरात दर्शनासाठी गेले असता त्यांना मतदारांच्या संतापाचा सामना करावा लागला. खासदार नवनीत राणा चौसाळा गावातील मंदिरात दर्शन घेऊन परत जात असताना काही तरूण शेतकऱ्यांनी त्यांना घेराव घातला. मंदिरापासून थोड्या अंतरावर असलेले एक फलक पाहण्यासाठी आमच्याबरोबर चला, अशी मागणी या लोकांनी केली. मात्र रात्रीचे १२ वाजले असून मला अजूनही चार ते पाच गावांमध्ये जायचे असल्याचे सांगून नवनीत राणा यांनी त्या लोकांबरोबर जाण्यास नकार दिला. तसेच तुमच्या ज्या काही अडचणी आहेत, त्या इथेच सांगा, असेही सांगितले. मात्र शेतकरी त्यांना फलक बघायला चलाच, या हट्टावर पेटले होते.नवनीत राणा या फलक पाहण्यासाठी येत नाहीत, हे पाहून शेतकऱ्यांनी नवनीत राणा यांना त्यांनी काही दिवसांपूर्वी केलेल्या विधानाची आठवण करून दिली. मोदींची हवा नसून या फुग्यात राहू नका, असे नवनीत राणा एकदम बरोबर बोलल्याचे शेतकरी म्हणाले. यावर नवनीत राणा चांगल्याच संतापल्या त्या म्हणाले, मोदींची हवा आहेच. तुम्हाला या विषयावर वाद घालायचा असल्यास मी तयार आहे, हे सांगून नवनीत राणा मंदिर परिसरातून बाहेर जाऊ लागल्या.नवनीत राणा माघारी फिरत असल्याचे पाहून गावातील शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. "तुम्हाला मतदान करून आम्ही चूक केली. तुम्ही आमच्या प्रश्नांची दखल घेत नाहीत. यावेळी मोदींना घरी पाठविणार, असे म्हणत गावकऱ्यांनी जय भवानी, जय शिवाजी", अशा घोषणा सुरू केल्या. या गदारोळात नवनीत राणा आपल्या गाडीत बसून थोड्या पुढे गेल्या. मात्र घोषणाबाजी

### घोषणाबाजी करण्यास सुरुवात

» काही तरूण शेतकऱ्यांनी त्यांना घेराव घातला. मंदिरापासून थोड्या अंतरावर असलेले एक फलक पाहण्यासाठी आमच्याबरोबर चला, अशी मागणी या लोकांनी केली. मात्र रात्रीचे १२ वाजले असून मला अजूनही चार ते पाच गावांमध्ये जायचे असल्याचे सांगून नवनीत राणा यांनी त्या लोकांबरोबर जाण्यास नकार दिला. तसेच तुमच्या ज्या काही अडचणी आहेत, त्या इथेच सांगा, असेही सांगितले. मात्र शेतकरी त्यांना फलक बघायला चलाच, या हट्टावर पेटले होते.नवनीत राणा या फलक पाहण्यासाठी येत नाहीत, हे पाहून शेतकऱ्यांनी नवनीत राणा यांना त्यांनी काही दिवसांपूर्वी केलेल्या विधानाची आठवण करून दिली. मोदींची हवा नसून या फुग्यात राहू नका, असे नवनीत राणा एकदम बरोबर बोलल्याचे शेतकरी म्हणाले. यावर नवनीत राणा चांगल्याच संतापल्या त्या म्हणाले, मोदींची हवा आहेच. तुम्हाला या विषयावर वाद घालायचा असल्यास मी तयार आहे, हे सांगून नवनीत राणा मंदिर परिसरातून बाहेर जाऊ लागल्या. नवनीत राणा माघारी फिरत असल्याचे पाहून गावातील शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली.

वाढू लागल्यानंतर त्या गाडी थांबवून खाली उतरल्या आणि घोषणाबाजी करणाऱ्या गर्दीत घुसून जाब विचारू लागल्या. मात्र नवनीत राणा यांचे सुरक्षा रक्षक आणि स्वीय सहाय्यकांनी वेळीच हस्तक्षेप करत त्यांना बाजूला केले आणि चिडलेल्या शेतकऱ्यांशी स्वतः चर्चा केली.अमरावतीच्या खासदार नवनीत राणा आणि त्यांचे पती आमदार रवी राणा हे हनुमान चालीसाच्या आंदोलनातून करोना काळात चांगलेच चर्चेत आले होते. यानिमित्त नवनीत राणा यांनीही आपल्या मतदारसंघातील हनुमान मंदिरांना भेटी दिल्या. मात्र अंजनगाव तालुक्यातील चौसाळा गावात हनुमान मंदिरात दर्शनासाठी गेले असता त्यांना मतदारांच्या संतापाचा सामना करावा लागला.

# संविधान बदलण्याचे भाजपचे लक्ष्य

## निवडणूक हातून निसटत असल्याने मोदी घाबरले : राहुल गांधी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशातील ९० टक्के जनतेच्या कल्याणासाठीचा पैसा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २५ उद्योगपतींना दिला आहे. परंतु देशातील जनता आता मोदींना पुरती ओळखली आहे. म्हणूनच मोदी घाबरले आहेत. लोकसभा निवडणूक त्यांच्या हातातून निसटत आहे.**



म्हणूनच ते पुन्हा पाकिस्तान, दोन समाजामधील द्वेषाची, खोटेपणाची भाषा वापरत आहेत, अशा शब्दात काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला.सोलापूर व माढा लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या प्रचारासाठी सोलापुरात आयोजित जाहीर सभेत राहुल गांधी बोलत होते. दुपारी तळपत्या उन्हात लक्ष्मी मिल मैदानावर झालेल्या या सभेस हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, सुशीलकुमार शिंदे, बाळासाहेब थोरात आदींची व्यासपीठावर उपस्थित होते.यंदाची लोकसभा निवडणूक केवळ जिंकण्याचे नव्हे तर संविधान बदलण्याचे भाजपचे लक्ष्य आहे. आम्हांला संविधान आणि लोकशाही वाचवायची आहे. कोणी कितीही प्रयत्न करीत

### 'गोदी मिडिया' प्रश्नांवर चर्चा करीत नाही

» कर्जमाफीची एवढ्या मोठ्या रकमेतून मनरेगासाठी २४ वर्षे वापरता आला असता. एवढ्याच पैशातून देशातील शेतकऱ्यांना २४ वर्षे कर्जमाफी मिळाली असती.\ ७० कोटी जनतेजवळ जेवढा पैसा आहे, तेवढाच पैसा २२-२५ धनाढ्यांच्या तिजोरीत आहे. त्यामुळे देशात आर्थिक विषमता वाढली आहे. मोदींच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात शेतकरी, शेतमजूर, कामगार, तरूण सर्वांची निराशा झाली आहे. म्हणूनच देशातील आम जनता आज संविधान आणि लोकशाही वाचविण्याच्या बाजूने खंबीरपणे उभी आहे, असा दावा राहुल गांधी यांनी केला.देशातील प्रसार माध्यमे मोदींच्या दबावाखाली असून ही 'गोदी मिडिया' शेतकरी, कामगार, गोरगरीब, दलित, आदिवासींच्या दररोजच्या जगण्याच्या प्रश्नांवर चर्चा करीत नाही. माध्यमांमध्ये सूत्रसंचालन करणा-यांमध्ये देशातील ९० टक्के मागासवर्गीय, आदिवासी, शेतक-यांचे प्रतिनिधित्व करणारा एकही दिसत नाही.

असले तरी संविधान बदलू शकत नाही, असे नमूद करीत राहुल गांधी यांनी, मोदी सरकारच्या मागील दहा वर्षांच्या कारभारावर टीकास्त्र सोडले. देशातील २२-२५ धनाढ्य उद्योगपतींना मोदी सरकारने १६ लाख कोटींची कर्जे माफ केली आहेत.

# फसव्या जाहिरातींवरील कारवाई का रोखली?

## सर्वोच्च न्यायालयाचा केंद्र सरकारला सवाल

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**पतंजली आयुर्वेद लिमिटेडच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींशी संबंधित खटल्याची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केंद्र सरकार आणि राज्य परवाना प्राधिकरणांना फटकारले. आयुर्वेदिक आणि आयुषशी संबंधित जाहिरातींवरील कारवाई रोखण्यासाठी आयुष मंत्रालयाने राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या परवाना प्राधिकरणांना पत्र का पाठविले, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केंद्राला विचारला.**

न्यायमूर्ती हिमा कोहली आणि अहसानुद्दीन अमानुल्ला यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी सुनावणी झाली. औषधे व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४५ च्या नियम १७० नुसार दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर कारवाई करण्यात येते. आयुष मंत्रालयाने २९ ऑगस्ट २०२३ मध्ये राज्यांना पत्र पाठवून औषधांचा परवाना देणारे अधिकारी आणि आयुषचे औषधे नियंत्रकांना नियम १७० वगळण्याचे निर्देश दिले. नियम हटविण्यासाठी २५ मे २०२३ रोजी केलेल्या आयुर्वेदिक, सिद्ध आणि युनानी औषधे तांत्रिक सल्लागार मंडळाच्या (एएसयूडीटीएबी) शिफारशींच्या आधारे या पत्रांद्वारे सर्व परवाना अधिकाऱ्यांना नियम १७० नुसार फसव्या जाहिरातींवर कारवाई न करण्याचे निर्देश दिले. न्या. कोहली यांनी याबाबत चिंता व्यक्त करत केंद्र सरकारवर ताशेरे ओढले. नियम १७० हटविण्याचा अर्थ काय? नियम १७० नुसार जाहिरातींवर प्रसिद्ध होण्यापूर्वी प्रतिबंध लावण्यात येत होता. मात्र ते जर हटविले तर औषधे व जादुई उपचार अधिनियमानुसार जाहिराती प्रसिद्ध झाल्यानंतर त्या अयोग्य आहेत की योग्य याची तपासणी होईल. हे अधिक चिंताग्रस्त आहे, असे न्या. कोहली यांनी सांगितले.योगगुरू रामदेवबाबा आणि पतंजली आयुर्वेद संस्थेचे संचालक आचार्य बाळकृष्ण यांनी फसव्या जाहिरातीप्रकरणी एक आठवड्याच्या आत जनतेची बिनशर्त माफी मागावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार पतंजलीने सोमवारी काही वृत्तपत्रांमध्ये माफीनामा प्रसिद्ध केला. मात्र न्यायालयाने या प्रकरणी पुन्हा पतंजलीला फटकारले. 'तुम्ही केलेल्या जाहिरातींच्या आकाराएवढा हा माफीनामा आहे का?' असा सवाल न्यायालयाने केला. या जाहिरातींसाठी दहा लाखांचा खर्च आल्याची माहिती पतंजलीचे वकील मुकुल रोहतगी यांनी दिली. ६७ वृत्तपत्रांमध्ये माफीनाम्यासंबंधी जाहिरात प्रसिद्ध झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पुढील सुनावणी आता ३० एप्रिल रोजी होणार असून पुढच्या सुनावणीत प्रसिद्ध झालेल्या माफीनाम्याचं कात्रण सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.तुमचे सदस्य डॉक्टर ॲलोपॅथीमधील महागडे व अनावश्यक औषधे लिहून देत असून हे त्यांचे अनैतिक कृत्य आहे. प्रतिवादीकडे बोट दाखवत असताना इतर चार बोटे तुमच्याकडेही आहेत. कारण तुमचे सदस्य डॉक्टर रुग्णांना महागड्या औषधांचा प्रचार करण्यात व्यग्र आहेत, अशा शब्दांत न्यायालयाने 'आयएमए'लाही फटकारले. आम्ही जनतेची फसवणूक होऊ देऊ शकत नाही,' असे सांगत न्यायालयाने फसव्या व दिशाभूल करणाऱ्या जाहिराती हाताळण्यासाठी केंद्र व राज्य परवाना प्राधिकरणाने सक्रिय असणे गरजेचे असल्याचे मत नोंदवले. पतंजली आयुर्वेद लिमिटेडच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींशी संबंधित खटल्याची सुनावणी करताना सांगितले की, इतर अनेक फास्ट-मूव्हिंग कन्झ्युमर गुड्स (एफएमसीजी) कंपन्या याच मार्गाने जात असून केंद्र सरकारने त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी काय केले, अशी विचारणाही न्यायालयाने केली.

### नियम 170 हटविण्याचा अर्थ काय?

» न्यायमूर्ती हिमा कोहली आणि अहसानुद्दीन अमानुल्ला यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी सुनावणी झाली. औषधे व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४५ च्या नियम १७० नुसार दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर कारवाई करण्यात येते. आयुष मंत्रालयाने २९ ऑगस्ट २०२३ मध्ये राज्यांना पत्र पाठवून औषधांचा परवाना देणारे अधिकारी आणि आयुषचे औषधे नियंत्रकांना नियम १७० वगळण्याचे निर्देश दिले. नियम हटविण्यासाठी २५ मे २०२३ रोजी केलेल्या आयुर्वेदिक, सिद्ध आणि युनानी औषधे तांत्रिक सल्लागार मंडळाच्या (एएसयूडीटीएबी) शिफारशींच्या आधारे या पत्रांद्वारे सर्व परवाना अधिकाऱ्यांना नियम १७० नुसार फसव्या जाहिरातींवर कारवाई न करण्याचे निर्देश दिले.न्या. कोहली यांनी याबाबत चिंता व्यक्त करत केंद्र सरकारवर ताशेरे ओढले. नियम १७० हटविण्याचा अर्थ काय? नियम १७० नुसार जाहिरातींवर प्रसिद्ध होण्यापूर्वी प्रतिबंध लावण्यात येत होता. मात्र ते जर हटविले तर औषधे व जादुई उपचार अधिनियमानुसार जाहिराती प्रसिद्ध झाल्यानंतर त्या अयोग्य आहेत की योग्य याची तपासणी होईल. हे अधिक चिंताग्रस्त आहे, असे न्या. कोहली यांनी सांगितले.

---

# धर्माच्या आधारावर आरक्षणाचा प्रयत्न!

## जनतेची संपत्ती ताब्यात घेण्याचे षड्यंत्र; पंतप्रधान मोदी यांचा आरोप

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।



**काँग्रेसने धर्माच्या आधारावर मुस्लिमांना आरक्षण देण्याचा प्रयत्न केला असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. तसेच त्या पक्षाने काही ठरावीक लोकांना वाटण्यासाठी जनतेची संपत्ती ताब्यात घेण्याचे व्यापक षड्यंत्र रचल्याचा पुनरुच्चार केला. टोंक येथील सभेत त्यांनी काँग्रेसवर चौफेर टीका केली.**

काँग्रेसच्या राजवटीत एखाद्याला आपल्या धर्माचे पालन करणेही कठीण होते. त्यांच्या सरकारमध्ये हनुमान चालीसा पठणही गुन्हा ठरला असा आरोप पंतप्रधानांनी केला. मंगळवारी हनुमान जयंती असल्याचा संदर्भ येथे होता. काँग्रेसने २००४ मध्ये केंद्रात सरकार स्थापन केल्यानंतर आंध्र प्रदेशात अनुसूचित जाती-जमातींचे आरक्षण कमी करून ते मुस्लिमांना दिले. मात्र आमच्या सरकारमध्ये दलित-आदिवासींचे आरक्षण बंद होणार नाही किंवा धर्माच्या आधारावर भेद केला जाणार नाही ही मोदींची हमी असल्याचे स्पष्ट केले. संपत्तीच्या फेरवाटपाचा मुद्दा पंतप्रधानांनी पुन्हा उपस्थित करत, काँग्रेस संपत्ती हिरावून काही ठरावीक लोकांना देईल असा आरोप केला. काँग्रेसने २००४ केंद्रात सरकार स्थापन झाल्यावर आंध्रमध्ये अनुसूचित जाती-जमातींचे आरक्षण कमी करून मुस्लिमांना दिले. देशभर त्यांना हे प्रारूप लागू करायचे होते. २००४ ते २०१० या काळात चार वेळा त्यांनी आंध्र प्रदेशात मुस्लिमांना आरक्षण देण्याचा प्रयत्न केला. मात्र कायदेशीर अडचणींमुळे त्यांना हे लागू करता आले नाही. २०११ मध्ये काँग्रेसने हे प्रारूप देशभर लागू करण्याचा प्रयत्न केला.

### मुस्लिमांना आरक्षण देण्याचा प्रयत्न

» अनुसूचित जाती-जमाती तसेच इतर मागासवर्गीयांचे आरक्षण मतपेढीच्या राजकारणासाठी इतरांना देऊ केले. त्या वेळी घटनेची तसेच बाबासाहेब आंबेडकरांची त्यांना चिंता नव्हती अशी टीका पंतप्रधानांनी केली. कर्नाटकमध्ये जेव्हा भाजप सरकार आले त्या वेळी पहिल्यांदा आम्ही मुस्लीम आरक्षण रद्द केले. काँग्रेस तसेच त्यांच्या मित्रपक्षांचे मतपेढीचे राजकारण उघड झाल्याचा आरोप बंसवरा येथील सभेत पंतप्रधानांनी केला. आम्ही काँग्रेसवर आरोप करताच त्यांचा थयथयाट सुरू झाला असा टोला मोदींनी लगावला.काँग्रेसने धर्माच्या आधारावर मुस्लिमांना आरक्षण देण्याचा प्रयत्न केला असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. तसेच त्या पक्षाने काही ठरावीक लोकांना वाटण्यासाठी जनतेची संपत्ती ताब्यात घेण्याचे व्यापक षड्यंत्र रचल्याचा पुनरुच्चार केला. टोंक येथील सभेत त्यांनी काँग्रेसवर चौफेर टीका केली.

# कपिल शर्माच्या प्रश्नावर आमिर खानने काय दिलं उत्तर?

बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट असं म्हटलं की आपल्यासमोर आपसूकच नाव येतं ते आमिर खानचं. आमिर खान त्याच्या चित्रपटांमुळे त्याच्या वक्तव्यांमुळे कायमच चर्चेत असतो. मुलाखतींमध्ये आमिर खान उत्तरं अशी काही देतो की त्याचे चाहतेही विचारात पडतात. याच आमिर खानने कपिल शर्माच्या द ग्रेट इंडियन कपिल शोमध्ये उपस्थिती दर्शवली होती. नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवरचा हा शो आहे. या शोचा एक प्रोमो सध्या चर्चेत आहे. त्यावरुन आमिर खान ज्या एपिसोडमध्ये येणार त्यात धमाल होणार हेच दिसतंय. एक प्रश्न आमिर खानला कपिल विचारतो तेव्हा त्याचा चेहरा मात्र पाहण्यासारखा झाला आहे.माझे मागचे दोन चित्रपट फ्लॉप झाले आहेत. पण दोनच." असं आमिर म्हणतो तेव्हा त्याला कपिल पटकन म्हणतो की तुझे फ्लॉप चित्रपटही उत्तम व्यवसाय करतात. लाल सिंग चड्ढा आणि ठग्ज ऑफ हिंदुस्थान या चित्रपटांना प्रेक्षकांनी नाकारलं. पण आमिरने ती बाब हलकेफुलकेपणात बोलून सोडून दिली आहे. पहिल्यांदाच आमिरने एखाद्या रिॲलिटी शोमध्ये उपस्थिती लावली आहे. आमिर खान रिॲलिटी शो आणि अवॉर्ड शोमध्ये फारसा जात नाही.या शोच्या प्रोमोची चर्चा चांगलीच रंगली आहे. आमिर या




शोमध्ये म्हणतो, "आज बोलताना माझ्या मनातल्या गोष्टी बाहेर येणार आहेत. मी खरं सांगतोय माझी मुलं माझं अजिबात ऐकत नाहीत." आमीर त्याच्या कपड्यांबाबतही बोलला. आमिर म्हणाला, "आज इथे येण्यापूर्वी मी काय कपडे घालायचे आहेत? यावर बरीच चर्चा झाली. त्यानंतर मी हे कपडे घालून आलो." अर्चना पूरणसिंग म्हणतात, "तू तर चांगले कपडे घातले आहेस रे." त्यावर आमिर म्हणतो, "हो पण मी शॉर्ट्समध्ये येणार होतो." ज्यानंतर सगळे हसू लागतात.या प्रोमोमध्ये अवॉर्ड शोज ना जाण्याचं कारणही आमिर खानने सांगितलं आहे. अर्चना पूरणसिंग विचारतात, तू अवॉर्ड शोमध्ये का जात नाहीस? त्यावर आमिर म्हणतो, "वेळ खूप मौल्यवान आहे, त्याचा उपयोग योग्यप्रकारे केला पाहिजे." हे ऐकूनही सगळे हसू लागतात. श्री इडियट्स, पी. के. या चित्रपटांतल्या आठवणीही आमिरने भरभरुन सांगितल्या आहेत असं दिसतं आहे.

## अर्पिता खानला केलं जातं ट्रोल

बॉलीवूड अभिनेता आयुष शर्मा सध्या त्याच्या आगामी चित्रपट 'रुस्लान'मुळे चर्चेत आहे. २०२१ रोजी प्रदर्शित झालेल्या 'अंतिम : द फायनल ट्रुथ' या चित्रपटात तो शेवटचा झळकला होता. तीन वर्षांनंतर पुन्हा एकदा आयुष 'रुस्लान' चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आयुषची पत्नी आणि भाईजान सलमान खानची बहीण अर्पिता खान अनेकदा तिच्या लुक्समुळे ट्रोल झालीय. चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान झालेल्या एका मुलाखतीत आयुषने अखेर या सगळ्यावर आपलं मत मांडलं आहे.सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत आयुष म्हणाला, "मी जेव्हा लग्न केलं तेव्हापासून माझ्या वैयक्तिक आयुष्याबाबत खूप बोललं जातंय. खूप जणांनी माझ्या अर्पिताच्या वजनाबाबत त्यांचं मत मांडलंय. आमच्या कुटुंबाजवळ असणाऱ्या लोकांना माहीत आहे की, ती दिवसभर अहिल आणि आयतबरोबर असते. या सगळ्या गोष्टींत तिला मदत करायला कोणी इतर व्यक्ती नाही आहे.

## मतभेद सर्वत्र होतात : राणी

काजोल व राणी या दोघीही बॉलीवूडमधील ९० च्या दशकातील सुप्रसिद्ध अभिनेत्री आहेत. अजुनही सिनेसृष्टीत सक्रिय असलेल्या या दोघीही एकमेकींच्या नातवाईक आहेत. काजोलचे वडील शोमू मुखर्जी आणि राणीचे वडील राम मुखर्जी हे सख्खे चुलत भाऊ होते. त्या नात्याने काजोल व राणी या चुलत बहिणी आहेत. दोघींचं जवळचं नातं असलं तरी त्यांचं एकमेकींशी फार सख्य नाही. राणीने काजोलबद्दल एका मुलाखतीत प्रतिक्रिया दिली आहे. 'गॅलाटा प्लस' ला दिलेल्या मुलाखतीत राणीने काजोल व तिच्या नात्याबद्दल विधान केलं. ती म्हणाली, "मला वाटतं की कुटुंब एक अशी गोष्ट आहे जी तुमच्यासोबत कायम राहते. त्यामुळे जगाने तुमच्याकडे कुटुंबासारखं पाहणं गरजेचं असतं. मतभेद सर्वत्र होतात, पण मतभेदाचे कारणच नसेल तर मतभेद का व्हावेत? माझ्यात आणि काजोलमध्येही तेच झालं. जे झालं ते फक्त गैरसमज व एकमेकींशी नीट संवाद न साधल्याने झालं."राणीने काजोलशी असलेल्या मतभेदाबद्दल प्रतिक्रिया दिली आहे, त्यामुळे त्यांच्यातील दुरावा मिटल्याची चर्चा होत आहे. राणीच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास ती शेवटची 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' या चित्रपटात झळकली होती. सध्या ती तिच्या आगामी चित्रपटांच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे.काजोलबद्दल बोलायचं झाल्यास ती 'लस्ट स्टोरीज २' या नेटफ्लिक्सवरील चित्रपटात दिसली होती. याशिवाय तिची द ट्रायल नावाची वेब सीरिज चांगलीच गाजली होती. या दोन्ही ओटीटीवरील कलाकृती होत्या.काजोल व राणी या दोघीही बॉलीवूडमधील ९० च्या दशकातील सुप्रसिद्ध अभिनेत्री आहेत. अजुनही सिनेसृष्टीत सक्रिय असलेल्या या दोघीही एकमेकींच्या नातवाईक आहेत. काजोलचे वडील शोमू मुखर्जी आणि राणीचे वडील राम मुखर्जी हे सख्खे चुलत भाऊ होते.



## विकी 'छावा' चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त!

'मसान', 'उरी', 'सॅम बहादूर' अशा अनेक चित्रपटांमधून आपली भूमिका चोख साकारणारा अभिनेता म्हणजेच विकी कौशल. विकी 'छावा' या त्याच्या आगामी चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. या चित्रपटात तो छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारणार आहे. वर्षाच्या अखेरीस हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अशातच विकीचा या चित्रपटातील अनसीन फोटो लिक झाला असून सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. २३ एप्रिलला विकीचे 'छावा' चित्रपटाच्या सेटवरील काही फोटोज सोशल मीडियावर व्हायरल झाले. या फोटोजमध्ये विकी मोठ्या दाढी-मिशीत दिसतोय, तर त्याचे भले-मोठे केस रुद्राक्ष माळेने वर बांधलेले दिसतायत. फिकट तपकिरी रंगाचा स्लीवलेस कुरता त्याला मॅचिंग असे धोतर आणि कमरेभोवती गुंडाळलेला लाल रंगाचा कपडा, तसेच गळ्यात रुद्राक्षाच्या माळा अशा या विकीच्या परिपूर्ण लूकने चाहत्यांना भुरळ पाडलीय.छावा' चित्रपटातील अभिनेत्याचा हा लूक सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय. याचाच एक फोटो एक्सवर एका चाहत्याने शेअर केला आहे. याला कॅप्शन देत त्याने लिहिलं, "कोणत्याही पात्रासारखं हुबेहूब दिसणं हे खरंच खूप कठीण काम आहे."छत्रपती शिवाजी महाराज यांचे सुपुत्र छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित हा चित्रपट असणार आहे. 'छावा' चित्रपटात विकी कौशलसह नॅशनल क्रश रश्मिका मंदानादेखील आहे. विकी छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत दिसणार आहे, तर रश्मिकाने त्यांची पत्नी येसूबाई भोसले यांची भूमिका साकारली आहे. रश्मिकाने नुकतंच या चित्रपटातील तिच्या भूमिकेचे शूटिंग पूर्ण केलं. चित्रपट पूर्ण झाल्यानंतर तिने इन्स्टाग्रामवर कॅप्शन देऊन 'छावा' चित्रपटाच्या टीमला शुभेच्छा दिल्या. चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर आणि सहकलाकार विकीचेही तिने आभार मानले.

## अनन्या पांडे आदित्य रॉय कपूरला डेट करतेय

बॉलीवूड अभिनेता चंकी पांडेची लेक अनन्या पांडे ही अभिनेता आदित्य रॉय कपूरला डेट करत आहे. दोघेही अनेकदा एकत्र व्हेकेशनला जाताना व इव्हेंट्सला जाताना पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद होतात. अनन्या व आदित्यचं नातं बॉलीवूडमधील चर्चेचा विषय आहे. आता अनन्याच्या रिलेशनशिपबाबत चंकीने प्रतिक्रिया दिली आहे. आपण आपल्या २५ वर्षांच्या मुलीवर नियंत्रण ठेवू इच्छित नाही, असं त्याने म्हटलं आहे. 'लेहरेन'ला दिलेल्या मुलाखतीत चंकीला अनन्याच्या रिलेशनशिपबद्दल आणि तिच्या मुलाखतींमध्ये ती आदित्यचा उल्लेख करते याबाबत विचारण्यात आलं. त्यावर चंकी म्हणाला, "ठीक आहे. मला वाटतं की ती २५ वर्षांची आहे, ती माझ्यापेक्षा जास्त पैसे कमावत आहे. त्यामुळे तिला हवं ते करायला ती मोकळी आहे. माझ्या २५ वर्षांच्या मुलीला तिने काय करावं हे सांगण्याची माझी हिंमत कशी होईल." चंकीने चित्रपटांमध्ये अनन्याने केलेल्या इंटिमेट सीनबद्दलही प्रतिक्रिया दिली. "मला त्या सीनबद्दल काहीच अडचण नाही. मी हॉलीवूड चित्रपटांमध्ये इंटिमेट सीन पाहिले आहेत. ते सीन करण्यात काही गैर नाही, तुम्हालाही ते स्वीकारावं लागेल," असं चंकी म्हणाला. चंकीला अनन्या व रायसा या दोन मुली आहेत. या मुली त्याच्याकडे सल्ला घेण्यासाठी येतात का? असं विचारल्यावर तो म्हणाला, "माझ्या दोन्ही मुली खरोखरच भावनाच्या (चंकीची पत्नी) खूप जवळ आहेत. जेव्हा त्यांना काही हवं असतं तेव्हा त्या मला फोन करतात, नाहीतर त्या त्यांच्या आईच्या खूप जवळ आहेत. अर्थात भावना व त्यांच्या वयात माझ्याइतकं अंतर नाही. पण जेव्हा त्यांना कोणताही सल्ला हवा असतो तेव्हा मी त्यांच्यासाठी हजर असतो."चंकीने अनन्याचं कौतुक केलं आणि तिला पहिला चित्रपट मिळाला, तेव्हाची आठवण सांगितली.



# दिल्लीचा गुजरातवर 4 धावांनी निसटता विजय!

## ऋषभ पंतने 43 चेंडूत नाबाद 88 तर अक्षरने 66 धावा केल्या

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएलच्या १७व्या हंगामातील ४० वा सामना दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स आमनेसामने होते, ज्यामध्ये दिल्ली कॅपिटल्सने गुजरात टायटन्सवर ४ धावांनी निसटता विजय मिळवला. दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना ऋषभ पंत आणि अक्षर पटेलच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर गुजरातसमोर २२५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. मात्र, प्रत्युत्तरात लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरात टायटन्स संघ ८ बाद २२० धावाच करु शकला.**





नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने २० षटकांत ४ गडी गमावून २२४ धावा केल्या. कर्णधार ऋषभ पंतने ४३ चेंडूत नाबाद ८८ तर अक्षर पटेलने ६६ धावांची खेळी साकारली. प्रत्युत्तरात गुजरातच्या संघाला २० षटकं संपल्यानंतर ८ बाद २२० धावाच करता आल्या. गुजरातसाठी डेव्हिड मिलरने २३ चेंडूत ५५ तर साई सुदर्शनने ३९ चेंडूत ६५ धावा केल्या. गुजरातचा दिल्लीविरुद्धचा हा सलग दुसरा पराभव आहे. यापूर्वी अहमदाबादमध्येही दिल्लीने गुजरातविरुद्ध ६ विकेट्सने विजय मिळवला होता.गुजरातला विजयासाठी शेवटच्या षटकात १९ धावा करायच्या होत्या. राशिद खानने पहिल्या दोन चेंडूंमध्ये दोन चौकार मारले. त्यानंतर गुजरातला चार चेंडूत केवळ ११ धावांची गरज होती. मात्र त्यानंतर राशिद खानला केवळ सहा धावा करता आल्या. ज्यामुळे २२० धावा केल्यानंतर गुजरातला ४ धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले. राशिद खानने ११ चेंडूत ३ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर नाबाद २१ धावांचे योगदान दिले. दिल्लीकडून रसिक सलामने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या.या विजयासह दिल्लीचा संघ आठ गुणांसह गुणतालिकेत सहाव्या स्थानावर आला आहे. त्यांनी नऊपैकी चार सामने जिंकले आहेत. त्याचबरोबर गुजरातचा संघ सहाव्या स्थानावरून सातव्या स्थानावर घसरला आहे. त्यांनी नऊपैकी पाच सामने गमावले असून त्यांचे आठ गुण आहेत. मात्र, नेट रन रेटमध्ये गुजरातचा संघ दिल्लीच्या मागे आहे. दिल्लीचा पुढील सामना मुंबई इंडियन्स विरुद्ध २७ एप्रिल रोजी दिल्लीत होणार आहे. त्याचवेळी गुजरातचा संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध २८ एप्रिल रोजी अहमदाबादमध्ये आपला पुढील सामना खेळणार आहे. दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात खेळल्या जात असलेल्या या सामन्यात दिल्ली संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात २२४ धावा केल्या. या दरम्यान ऋषभ पंत आणि अक्षर पटेल यांच्या बॅटमधून चमकदार खेळी पाहायला मिळाली. त्याचवेळी या सामन्यात गुजरात टायटन्सच्या गोलंदाज मोहित शर्माने एक नकोसा विक्रमही केला. मोहित शर्मा हा गोलंदाज खूप महागडा ठरला आणि लीगच्या इतिहासातील सर्वात महागडा स्पेल टाकण्याचा विक्रम त्याच्या नावावर झाला.गुजरात टायटन्सचा वेगवान गोलंदाज मोहित शर्मा या सामन्यात चांगलाच महागडा ठरला. त्याने आपल्या ४ षटकांच्या स्पेलमध्ये ७३ धावा दिल्या आणि एकही विकेट घेतली नाही. यासह त्याने आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा स्पेल टाकण्याचा विक्रम केला. यापूर्वी हा विक्रम बेसिल थम्पीच्या नावावर होता. बासिल थम्पीने २०१८ मध्ये ४ षटकात ७० धावा दिल्या होत्या. त्याचबरोबर यश दयाल या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. यश दयालने गुजरात टायटन्सकडून खेळताना ४ षटकात ६९ धावा दिल्या होत्या. ज्यात त्याच्या एका षटकात रिंकू सिंगने पाच षटकारही मारले होते.

### एका षटकात दिल्या 31 धावा

» हंगामातील ४० वा सामना दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स आमनेसामने होते, ज्यामध्ये दिल्ली कॅपिटल्सने गुजरात टायटन्सवर ४ धावांनी निसटता विजय मिळवला. मोहित शर्माने या डावातील शेवटचे षटकही टाकले. यावेळी ऋषभ पंत स्ट्राइकवर होता. मोहित शर्माने या षटकात एकूण ३१ धावा दिल्या. वाईड बॉलमधून १ धाव आणि ऋषभ पंतच्या बॅटमधून ३० धावा आल्या. या षटकात ऋषभ पंतने १ चौकार आणि ४ षटकार ठोकले. पंत या डावात सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. त्याने ४३ चेंडूत नाबाद ८८ धावा केल्या. दुसरीकडे अक्षर पटेलनेही अप्रतिम फलंदाजी केली. तो ४३ चेंडूत ६६ धावा करून बाद झाला.

# मार्कस स्टॉइनसची ऐतिहासिक खेळी

## लखनौचा संघ गुणतालिकेत पोहोचला चौथ्या स्थानावर

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**केएल राहुलच्या लखनऊने चेपॉकचा अभेद्य किल्ला भेदत चेन्नईला त्यांच्याच घरच्या मैदानावर पराभूत केले. चेन्नईने दिलेल्या २११ धावांच्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करत स्टॉइनसच्या शतकी खेळीच्या जोरावर विक्रमी विजयाची नोंद केली. एलएसजीने चेन्नईमध्ये आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करत विजय मिळवला आहे. चेन्नईविरुद्ध चेपूकमध्ये २११ धावांचे लक्ष्य पार करत लखनौ संघाने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे लखनौ संघऊने ३ चेंडू शिल्लक असताना ही धावसंख्या गाठली.**



मार्कस स्टॉइनसने आयपीएलच्या इतिहासातील सर्वोत्तम खेळी केली आहे. त्याने एकट्याने लखनौ संघाला सामना जिंकून दिला. या विजयासह लखनौचा संघ गुणतालिकेत चौथ्या स्थानावर पोहोचला आहे. लखनौने चेन्नई संघाचा या हंगामात सलग दुसऱ्यांदा पराभव केला आहे. यापूर्वी लखनौमध्येच चेन्नई संघाचा एलएसजीकडून पराभव झाला होता. तर आता चेपाऊक वरही लखनऊने बाजी मारली आहे.

मार्कसने या सामन्यात ६३ चेंडूत १२४ धावांची नाबाद खेळी केली. ज्यामध्ये त्याने १३ चौकार आणि ६ षटकार मारले. आयपीएलच्या इतिहासातील मार्कसची ही सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे. यासोबतच त्याने आयपीएलचा १३ वर्षे जुना विक्रमही मोडला आहे. आयपीएलमधील दुसऱ्या डावात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम आता मार्कस स्टॉइनसच्या नावावर नोंदवला गेला आहे. यापूर्वी पॉल वल्थाटीने २०११ मध्ये चेन्नईविरुद्ध १२० धावांची नाबाद इनिंग खेळली होती.

तर वीरेंद्र सेहवागने २०११ मध्ये डेक्कन चार्जर्सविरुद्ध ११९ धावांची इनिंग खेळली होती. या यादीत संजू सॅमसनचाही समावेश आहे. त्याने २०२१ मध्ये पंजाबविरुद्ध ११९धावांची इनिंग खेळली होती. तर शेन वॉटसनने २०१८ मध्ये हैदराबादविरुद्ध ११७ धावांची नाबाद खेळी खेळली होती.८ वर्षांपूर्वी आयपीएलमध्ये पदार्पण करणाऱ्या मार्कस स्टॉइनिसने यांच्या हंगामात पहिल्यांदाच शतक झळकावले आहे. पहिले शतक झळकावण्यासाठी त्याला आठ वर्षे लागली. मार्कसच्या खेळीमुळे लखनौचा संघ गुणतालिकेत चौथ्या स्थानावर पोहोचला आहे लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करत स्टॉइनसच्या शतकी खेळीच्या जोरावर विक्रमी विजयाची नोंद केली.

### एकट्याने सामना जिंकून दिला

» एलएसजीने चेन्नईमध्ये आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करत विजय मिळवला आहे. चेन्नईविरुद्ध चेपूकमध्ये २११ धावांचे लक्ष्य पार करत लखनौ संघाने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे लखनौ संघऊने ३ चेंडू शिल्लक असताना ही धावसंख्या गाठली. मार्कस स्टॉइनसने आयपीएलच्या इतिहासातील सर्वोत्तम खेळी केली आहे.